अभ्युदय नगर
सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
(नोंदणी क्रमांक : एम. यु. एम./ एम.एच.ए.डी.बी./ एच. एस.जी. / टी.सी. ) १२४९२ / सन २००६ -२००७)
कार्यालय : समाज मंदिर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.

जा. क्र. ८७/२०१७-१८

दिनांक : १३/०१/२०१८

प्रति,

**सन्माननीय अभ्युदयनगरमधील रहिवाशी बंधू-भगिनींनो....!**

**विषय : १) अभ्युदयनगर म्हाडा वसाहतीतील गाळेधारकांस लागू केलेला वाढीव सेवा शुल्क आकाराबाबत...**
**२) अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाबाबत...**
**३) शुन्य कचऱ्याचे नियोजन.**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयान्वये आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकासम मंडळाने म्हाडा वसाहतीमधील गाळेधारक, सहकारी गृहनिर्माण संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ यांना कोणासही विश्वासात न घेता व तसेच १९९८ पासून अभ्युदयनगर या म्हाडा वसाहतीत पाणी पुरवठ्याव्यतिरिक्त कोणतीही सुविधा न पुरविता प्रत्येक गाळेधारकास मासिक सेवा शुल्क **रुपये १५१/- वरुन रुपये १०२७/-** करत असल्याचे व १९९८ पासून थकबाकी वसुली करिता कार्यवाही करत असल्याचे जानेवारी २०१८च्या पहिल्या आठवड्यात संघाच्या निदर्शनास आले.

संघाने ही वस्तुस्थिती काय आहे व वाढीव सेवा शुल्क एकतर्फी वाढविण्यात येऊ नये याकरिता विनंती अर्ज खालीलप्रमाणे केलेले आहेत.

**१) मा. ना. देवेंद्रजी फडणवीस** — अर्ज पोच दिनांक : ०४.०१.२०१८
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**२) मा. ना. श्री. प्रकाश मेहता** — अर्ज पोच दिनांक : ०२.०१.२०१८
गृहनिर्माण मंत्री,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पान नं. २ वर....

**३) मा. ना. श्री. अजय चौधरी** अर्ज पोच दिनांक : ०३.०१.२०१८

आमदार, शिवडी विधानसभा.

**४) मा. मुख्याधिकारी** अर्ज पोच दिनांक : ०२.०१.२०१८

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,

बांद्रा, मुंबई - ४०० ०५१.

स्थानिक आमदार श्री. अजय चौधरी यांनी दिनांक ०३.०१.२०१८ रोजी मा. मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, बांद्रा, मुंबई - ४०० ०५१ यांना पत्र लिहून **वाढीव शुल्काबाबत तातडीने बैठक आयोजित करणेकरीता विनंती केलेली आहे.** उपरोक्त सर्व पत्रांच्या झेरॉक्स प्रती आपल्या माहितीकरिता सोबत जोडलेल्या आहेत. तरी ही बाब आपल्या संस्थेच्या सभासदांना निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

मुंबई महानगर पालिकेकडून अभ्युदयनगरमधील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांना वारंवार शुन्य कचरा नियोजनाकरिता पत्र पाठविली जात आहेत. याबाबत **शुन्य कचरा नियोजनाची वस्तुस्थिती समजून घेण्याकरिता, आपल्या विभागाचे नगरसेवक मा. श्री. दत्ता पोंगडे साहेब यांना संघाने दिनांक ३०.१२.२०१७ रोजी पत्र दिलेले आहे** व मुंबई महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करणेकरिता विनंती केलेली आहे. मुंबई महानगर पालिकेकडून बैठकीची तारीख कळताच अभ्युदयनगरमधील सर्व संस्थांना अवगत करुन दिली जाईल.

अभ्युदयनगरमधील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था व अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ यांचे सहकार्याने अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाची प्रक्रिया चालू आहे. पुनर्विकास प्रक्रियेतील महत्वाच्या विकास करारनामाचे काम संघामार्फत नियुक्त केलेले **सॉलिसिटर मे. दिव्या शहा ॲन्ड असोशिएट व विकासकाचे सॉलिसिटर मे. वाडिया गांधी ॲन्ड असोशिएट** यांचे कडून पूर्ण होत आलेले आहेत. **विकास करारनामाची प्रत** आपणांकडे पोहोचविण्यास संघ अत्यंत प्रयत्नशील आहे. लवकरात लवकर विकास करारनामाची झेरॉक्स प्रत अभ्युदयनगरमधील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था व गाळेधारक यांना उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

असे असताना अभ्युदयनगरमधील प्रत्येक गाळेधारकांच्या घरी खालील **मथळ्यांची निनावी व सही नसलेली पत्रके** टाकली जात आहेत व त्याबाबत स्पष्टीकरण खालीलप्रमाणे :-

**''महासंघ व रुस्तमजीचेच स्ट्रक्चल ऑडीट करण्याची गरज''**

अभ्युदयनगरमधील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांनी, अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या संघाच्या मार्फत अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाची प्रक्रिया चालू आहे. पुनर्विकासाची प्रक्रिया ही वेगवेगळ्या फेज मध्ये अपेक्षित आहे. अभ्युदयनगरचा एकत्रित पुनर्विकास होण्याकरीता जो कालावधी लागणार आहे, तोपर्यंत इमारती रहिवाशांना राहाण्यायोग्य आहेत किंवा नाही हे तपासून घेणे गरजेचे आहे व त्या इमारती दुरुस्त करणे आवश्यक आहे, त्या इमारती दुरुस्त करणे निविदाप्रमाणे गरजेचे आहे, म्हणून निविदेनुसार नेमणूक केलेले विकासक मे. किस्टोन रिअॅल्टर्स प्रा. लि. हे इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन घ्या, असे संस्थांना विनंती करत आहेत.

**परंतु विरोधक यांचा विपर्यास करुन निनावी व विना सहीची पत्रके टाकून अभ्युदयनगर वासियांची दिशाभूल करत आहेत.**

**''।। महासंघात उभी फुट, रुस्तमजी आडवा ।।''**

अभ्युदयनगरमधील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी व सभासद यांना ज्ञात आहेच की, मार्च २०१६ पासून **श्री. नंदकुमार काटकर - अध्यक्ष, श्री. विलास सावंत - उपाध्यक्ष व श्री. जयसिंग भोसले - सरचिटणीस** यांचे नेतृत्वाखाली संघाचे कामकाज चालू झाले. तेव्हापासून संघाचे सर्व १४ पदाधिकारी / समिती सदस्य एकविचाराने अभ्युदयनगरमधील समस्या व अभ्युदयनगरचा एकत्रित पुनर्विकास याबाबत काम करत आहेत. संघाच्या पदाधिकारी / समिती सदस्य यांच्यामध्ये कसलेही मतभेद नाहीत.

**''मुंबई बँकेची स्वयं पुनर्विकास योजना, महासंघाचे अध्यक्ष काटकराकडून प्रमोशन, तर निखिल दिक्षित पीएमसी''**

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड ही बँक मागील कित्येक वर्षांपासून सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीकरीता योजना गृहनिर्माण सहकारी संस्थांसाठी स्वयंपुनर्विकास योजनेचा उपक्रम राबवित असून त्या योजनेस बँक आर्थिक सहकार्य करत आहे. सदर बँकेने दिनांक ०८.०१.२०१८ रोजी गृहनिर्माण सहकारी संस्थांसाठी स्वयंपुनर्विकास योजनेचा उपक्रम या विषयावर एक परिषद आयोजित केलेली होती. सदर परिषदेस संघाचे **अध्यक्ष श्री. नंदकुमार काटकर** हे मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे **विद्यमान जेष्ठ संचालक व माजी अध्यक्ष** असल्यामुळे बँकेने आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमांमध्ये त्यांनी सक्रीय भाग घेतलेला होता तसेच **श्री. निखिल दिक्षित, वास्तुविशारद** यांची बँकेने गृहनिर्माण सहकारी संस्थांसाठी स्वयंपुनर्विकास योजनेच्या उपक्रमास

मार्गदर्शक म्हणून नेमणूक केली असल्यामुळे ते उपस्थितांना मार्गदर्शन करण्याकरिता सदर कार्यक्रमात हजर होते.

अभ्युदयनगरमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांनी एकत्रित पुनर्विकासाकरीता मे.किस्टोन रिॲल्टर्स प्रा.लि. या विकासकाची निवड अगोदरच केलेली आहे. मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेने आयोजित केलेल्या कार्यक्रमास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री प्रमुख पाहुणे होते. त्याचे औचित्य साधून संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार काटकर व कार्यकारणी सदस्य यांनी म्हाडाने वाढ केलेले सेवाशुल्क रद्द करणेबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांकडे शिष्टमंडळाव्दारे निवेदन सादर केले.

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा व अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकास प्रक्रियेचा काहीही संबंध नाही.

तरी अभ्युदयनगरमधील सर्व सुज्ञ गाळेधारक / सुज्ञ रहिवाशांना विनंती करण्यात येते की, पुनर्विकासासंबंधी जी निनावी / विना सहीची पत्रके घरोघरी पडतात, ती वाचून विचलित होऊ नये.

अभ्युदयनगरमधील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी / समिती सदस्य व सभासद यांना कळविण्यात येते की, अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाचे कामकाज कायदेशीररित्या चालू आहे. पुनर्विकासासंबंधी ज्यांना कोणास काही शंका असतील त्यांनी दररोज सायंकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत समाजमंदिरातील संघाच्या कार्यालयात येऊन, उपस्थित पदाधिकाऱ्यांकडून त्याची माहिती घेऊन खात्री करुन घ्यावी ही विनंती.

**धन्यवाद...!**

**आपले विश्वासू,**

**( जयसिंग शि. भोसले )**

**सरचिटणीस**

# अभ्युदय नगर
## सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
(नोंदणी क्रमांक : एम. यु. एम./ एम.एच.ए.डी.बी./ एच. एस.जी. / टी.सी. ) १२४९२ / सन २००६ -२००७)

कार्यालय : समाज मंदिर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.


जा. क्र. ८३/२०१७-१८

दिनांक : ०२।०१।२०१८

मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक 3/1/18
O/C

प्रति,
**मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब**
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय : <u>अभ्युदयनगर म्हाडाच्या वसाहतीतील गाळेधारकांस लागू केलेल्या वाढीव सेवा शुल्क आकाराबाबत...</u>**

**महोदय,**

उपरोक्त विषयासंदर्भात आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, अभ्युदयनगर ही एकूण ४८ इमारतींची म्हाडाची वसाहत आहे. अभ्युदयनगर या वसाहतीमध्ये शासकीय अधिकारी / कर्मचारी व औद्योगिक कामगार यांची वसाहत आहे. मुंबई गृहनिर्माण मंडळाने अनुक्रमे १९९०-९१ व १९९४-९५ साली शासकीय अधिकारी / कर्मचारी व औद्योगिक कामगार यांना इमारतीचे बांधकाम मालकी तत्वावर देऊन इमारती निहाय सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यास परवानगी दिलेली होती. त्यानुसार अभ्युदयनगर मधील एकूण ४८ इमारतीत नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्या व तेव्हापासून इमारतीमधील खालील सेवा-सुविधा सदर नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांमार्फत गाळेधारकांना पुरविल्या जात आहेत.

१) इमारत बांधकाम दुरुस्ती / अंतर्गत गळती व रंगकामाचे खर्च संस्था करत आहेत.

२) इमारतीमधील निवासी / अनिवासी गाळ्यांचा मालमत्ता कर संस्था परस्पर महापालिकेत भरत आहे.

३) इमारतींची स्वच्छता / इमारतीमधील सार्वजनिक विद्युत पुरवठा यांच्या खर्चाची पुर्तता संस्था परस्पर करत आहेत.

सध्या अभ्युदयनगरमधील एकूण ४८ इमारतींच्या गाळेधारकांकरीता मुंबई गृहनिर्माण मंडळाकडून फक्त पाणी पुरवठा करण्यात येते आहे. सदर पाणी पुरवठा करणाऱ्या पंपसेट मागील कित्येक वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार यांचे निधीमधून खरेदी केलेले आहेत.

पान नं. २ वर....

अभ्युदयनगरमधील जलवाहिन्या दुरुस्ती खर्च देखील कित्येक वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधींच्या फंडातून केला जात आहेत. सदर पाण्याचे पंप चालविण्याकरीता चालक म्हणून जो कर्मचारी/कामगार काम करत आहे. त्यांच्या रोजगाराचा खर्च/विद्युत मोटार व पंप दुरुस्तीचा खर्च/अभ्युदयनगरचे गाळेधारक सामुदायिकरीत्या करत आहेत.

अभ्युदयनगरमधील इमारतींना म्हाडाने बांधलेल्या टाकीतून पाणी पुरवठा होत आहे. त्याकरीता अभ्युदयनगर मधील प्रत्येक गाळेधारक मुंबई गृहनिर्माण मंडळाकडे मासिक सेवा शुल्कापोटी खालील रक्कम नियमितपणे भरत आहे.

| **पुरविण्यात येणारी सेवा** | **भरणा करत असलेली रक्कम** |
|---|---|
| पाणीपट्टी | रु. १२१/- |
| मोटार विद्युत देयक आकार | रु. २७/- |
| लीज भाडे | रु. ३/- |
| **एकूण** | **रु. १५१/-** |

याशिवाय मुंबई गृहनिर्माण मंडळाने वेळोवेळी आकारलेला बिगर शेतीकर वसाहतीमधील प्रत्येक गाळेधारकांनी भरलेला आहे.

अशा परिस्थितीत मुंबई गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळाने अभ्युदयनगरमधील रहिवाशांना विचारात न घेता माहे एप्रिल २०१७ पासून मासिक सेवा शुल्क रुपये १५१/- मध्ये वाढ करुन रुपये १०२७/- आकारण्यास सुरुवात केली आहे. हे वाढीव सेवा शुल्क अभ्युदयनगरमधील गाळेधारकांना अनाकलनीय आहे.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, अभ्युदयनगरच्या गाळेधारकांना / अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्या. व सदस्य सहकारी गृहनिर्माण संस्थांना विचारात न घेता मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने केलेली सेवा शुल्कातील वाढ रद्द करावी ही विनंती.

आपले विश्वासू,

( नंदकुमार काटकर )
अध्यक्ष

अभ्युदय नगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
नोंदणी क्र.
एमयुएस/एमएच/
एडीबी / एचएसजी /
टी.सी) १२४९२ /
सन २००६-०७
मुंबई-३३.

( जयसिंग शि. भोसले )
सरचिटणीस

# अभ्युदय नगर
## सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
(नोंदणी क्रमांक : एम. यु. एम./ एम.एच.ए.डी.बी./ एच. एस.जी. / टी.सी. ) १२४९२ / सन २००६ -२००७)

कार्यालय : समाज मंदिर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.


जा. क्र. ७८/२०१७-१८ — 2/1/2018 — दिनांक : ०२/०१/२०१८

लिपिक
मंत्री, गृहनिर्माण
यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
0016

प्रति,
**मा.ना.श्री. प्रकाश मेहता साहेब**
मंत्री गृहनिर्माण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय : **अभ्युदयनगर म्हाडाच्या वसाहतीतील गाळेधारकांस लागू केलेल्या वाढीव सेवा शुल्क आकाराबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, अभ्युदयनगर ही एकूण ४८ इमारतींची म्हाडाची वसाहत आहे. अभ्युदयनगर या वसाहतीमध्ये शासकीय अधिकारी / कर्मचारी व औद्योगिक कामगार यांची वसाहत आहे. मुंबई गृहनिर्माण मंडळाने अनुक्रमे १९९०-९१ व १९९४-९५ साली शासकीय अधिकारी / कर्मचारी व औद्योगिक कामगार यांना इमारतीचे बांधकाम मालकी तत्वावर देऊन इमारती निहाय सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यास परवानगी दिलेली होती. त्यानुसार अभ्युदयनगर मधील एकूण ४८ इमारतीत नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्या व तेव्हापासून इमारतीमधील खालील सेवा-सुविधा सदर नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांमार्फत गाळेधारकांना पुरविल्या जात आहेत.

१) इमारत बांधकाम दुरुस्ती / अंतर्गत गळती व रंगकामाचे खर्च संस्था करत आहेत.

२) इमारतीमधील निवासी / अनिवासी गाळ्यांचा मालमत्ता कर संस्था परस्पर महापालिकेत भरत आहे.

३) इमारतींची स्वच्छता / इमारतीमधील सार्वजनिक विद्युत पुरवठा यांच्या खर्चाची पुर्तता संस्था परस्पर करत आहेत.

सध्या अभ्युदयनगरमधील एकूण ४८ इमारतींच्या गाळेधारकांकरीता मुंबई गृहनिर्माण मंडळाकडून फक्त पाणी पुरवठा करण्यात येते आहे. सदर पाणी पुरवठा करणाऱ्या पंपसेट मागील कित्येक वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार यांचे निधीमधून खरेदी केलेले आहेत.

पान नं. २ वर....

अभ्युदयनगरमधील जलवाहिन्या दुरुस्ती खर्च देखील कित्येक वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधींच्या फंडातून केला जात आहेत. सदर पाण्याचे पंप चालविण्याकरीता चालक म्हणून जो कर्मचारी/कामगार काम करत आहे. त्यांच्या रोजगाराचा खर्च/विद्युत मोटार व पंप दुरुस्तीचा खर्च/अभ्युदयनगरचे गाळेधारक सामुदायिकरीत्या करत आहेत.

अभ्युदयनगरमधील इमारतींना म्हाडाने बांधलेल्या टाकीतून पाणी पुरवठा होत आहे. त्याकरीता अभ्युदयनगर मधील प्रत्येक गाळेधारक मुंबई गृहनिर्माण मंडळाकडे मासिक सेवा शुल्कापोटी खालील रक्कम नियमितपणे भरत आहे.

| **पुरविण्यात येणारी सेवा** | **भरणा करत असलेली रक्कम** |
|---|---|
| पाणीपट्टी | रु. १२१/- |
| मोटार विद्युत देयक आकार | रु. २७/- |
| लीज भाडे | रु. ३/- |
| **एकूण** | **रु. १५१/-** |

याशिवाय मुंबई गृहनिर्माण मंडळाने वेळोवेळी आकारलेला बिगर शेतीकर वसाहतीमधील प्रत्येक गाळेधारकांनी भरलेला आहे.

अशा परिस्थितीत मुंबई गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळाने अभ्युदयनगरमधील रहिवाशांना विचारात न घेता माहे एप्रिल २०१७ पासून मासिक सेवा शुल्क रुपये १५१/- मध्ये वाढ करुन रुपये १०२७/- आकारण्यास सुरुवात केली आहे. हे वाढीव सेवा शुल्क अभ्युदयनगरमधील गाळेधारकांना अनाकलनीय आहे.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, अभ्युदयनगरच्या गाळेधारकांना / अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्या. व सदस्य सहकारी गृहनिर्माण संस्थांना विचारात न घेता मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने केलेली सेवा शुल्कातील वाढ रद्द करावी ही विनंती.

**आपले विश्वासू,**

**( नंदकुमार काटकर )**
**अध्यक्ष**

नोंदणी क्र. एमयुएस/एमएच/ एडीबी / एचएसजी / टी.सी) १२४९२ / सन २००६-०७
मुंबई-३३.

**( जयसिंग शि. भोसले )**
**सरचिटणीस**

अभ्युदय नगर
सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
(नोंदणी क्रमांक : एम. यु. एम./ एम.एच.ए.डी.बी./ एच. एस.जी. / टी.सी. ) १२४९२ / सन २००६ -२००७)
कार्यालय : समाज मंदिर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.

०/८

जा. क्र. ८१/२०१७-१८

दिनांक : ०२/०१/२०१८

प्रति,
**मा.ना.श्री. अजय चौधरी साहेब,**
आमदार - शिवडी विधानसभा,
मुंबई.

३/०१/२०१८
कार्यालय पोहच
श्री. अजय विनायक चौधरी (आमदार)

**विषय : अभ्युदयनगर म्हाडाच्या वसाहतीतील गाळेधारकांस लागू केलेल्या वाढीव सेवा शुल्क आकाराबाबत...**

**महोदय,**

उपरोक्त विषयासंदर्भात आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, अभ्युदयनगर मधील एकूण ४८ इमारतींचा देखभाल खर्च व सेवा शुल्क खर्च संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था करत आहे.

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ अभ्युदयनगरच्या पाण्याच्या टाक्यांमधून अभ्युदयनगरच्या गाळेधारकांना फक्त पाणी पुरवठा करत आहे. पाणी पुरविण्यासाठी लागणाऱ्या पंपसेटची खरेदी व त्याचा दुरुस्तीचा खर्च कित्येक वर्षांपासून स्थानिक आमदारांच्या फंडातून केला जात आहे. पंप चालविण्याकरीता कामगारांच्या रोजगाराचा खर्च अभ्युदयनगरचे गाळेधारक सार्वजनिकरित्या करत आहेत.

अभ्युदयनगरच्या गाळेधारकांना मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पाण्याव्यतिरिक्त कोणतीही सेवा-सुविधा देत नाही व सदर पाणी पुरवठा सुविधेकरीता अभ्युदयनगरचा प्रत्येक गाळेधारक मासिक सेवा शुल्क म्हणून खालील रक्कमांचा भरणा मुंबई गृहनिर्माण मंडळाकडे करत आहे.

| पुरविण्यात येणारी सेवा | भरणा करत असलेली रक्कम |
|---|---|
| पाणीपट्टी | रु. १२१/- |
| मोटार विद्युत देयक आकार | रु. २७/- |
| लीज भाडे | रु. ३/- |
| **एकूण** | रु. १५१/- |

पान नं. २ वर....

याशिवाय मुंबई गृहनिर्माण मंडळाने वेळोवेळी आकारलेला बिगर शेतीकर वसाहतीमधील प्रत्येक गाळेधारकांनी भरलेला आहे.

अशा परिस्थितीत मुंबई गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळाने अभ्युदयनगरच्या गाळेधारकांना पाण्याव्यतिरिक्त कोणतीही सेवा न पुरवता मासिक सेवाशुल्कापोटी माहे एप्रिल २०१७ पासून मासिक सेवा शुल्क रुपये १५१/- मध्ये वाढ करुन रुपये १०२७/- आकारण्यास सुरुवात केली आहे.

या संदर्भात संघाने मा.मुख्याधिकारी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ व मा.गृहनिर्माण मंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पत्रे लिहिलेली आहेत. त्याही पत्रांच्या प्रती आपल्या माहितीकरीता सोबत जोडलेल्या आहेत.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, अभ्युदयनगरच्या गाळेधारकांना मुंबई गृहनिर्माण मंडळाकडून वाढ केलेले सेवा शुल्क अन्यायकारक आहे.

तरी सदरच्या सेवा शुल्काची वाढ रद्द करणेकरिता आपण मा.गृहनिर्माण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे बैठक आयोजित करावी ही विनंती.

**आपले विश्वासू,**

**( नंदकुमार काटकर )**
**अध्यक्ष**

अभ्युदय नगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
नोंदणी क्र. एमयुएस/एमएच/एडीबी / एचएसजी / टी.सी) १२४१२ / सन २००६-०७
मुंबई-३३.

**( जयसिंग शि. भोसले )**
**सरचिटणीस**

महाराष्ट्र विधानसभा

विधान सभा
महाराष्ट्र

अजय चौधरी

शिवसेना आमदार
१८३ शिवडी विधानसभा

सदस्य - विधानसभा विशेषाधिकार समिती
सदस्य - धर्मादाय रुग्णालय समिती

संदर्भ क्र.: ऐसी/म्हाडा/०१०/०१-२०१८

दिनांक : ०३.०१.२०१८

प्रति,
मा. मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ ,
गृहनिर्माण भवन, कलानगर,
बांद्रा, मुंबई ४०० ०५१.

आज प्राप्त झाले
दिनांक 4/01/18
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास
मंडळ मुंबई - ४०० ०५१.

यांसी सस्नेह जय महाराष्ट्र!

**विषय : अभ्युदयनगर म्हाडाच्या वसाहतीमधील गाळेधारकांस लागू केलेल्या वाढीव सेवा शुल्क आकारणीबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्यादित यांचा विनंती अर्ज पत्रासोबत जोडित असून म्हाडाकडून गाळेधारकांस लागू केलेल्या वाढीव सेवा शुल्क आकारणीबावत रहिवाशांमध्ये प्रचंड असंतोष आहे.

याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यासाठी आपण आपल्या दालनामध्ये तातडीची एक संयुक्त बैठक आयोजित करावी व या बैठकिस संबंधित विभागाचे अधिकारी, अभ्युदय नगर सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या संघाचे पदाधिकारी यांना बोलविण्यात यावे व या बैठकिची नियोजित वेळ मला अवगत करावी. ही विनंती.

**धन्यवाद!**

**जय हिंद! जय महाराष्ट्र!!**

आपला नम्र,

अजय चौधरी
आमदार

कार्यालय : ६२, गौरी आशिष, भगवंतराव परळकर मार्ग, परळगांव, मुंबई - ४०० ०१२.
दूरध्वनी : २४१२ २३५४ भ्रमणध्वनी : ९८२०५१०१७१ ई-मेल : ajaychoudhari.shivsena@gmail.com

# अभ्युदय नगर
## सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)

(नोंदणी क्रमांक : एम. यु. एम./ एम.एच.ए.डी.बी./ एच. एस.जी. / टी.सी. ) १२४९२ / सन २००६ -२००७)

कार्यालय : समाज मंदिर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.


जा. क्र. ८० / २०१७-१८ दिनांक : ०२/०१/२०१८

प्रति,

**मा. मुख्याधिकारी**

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,

गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१.

**विषय : अभ्युदयनगर म्हाडाच्या वसाहतीतील गाळेधारकांस लागू केलेल्या वाढीव सेवा शुल्क आकाराबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, अभ्युदयनगर ही एकूण ४८ इमारतींची म्हाडाची वसाहत आहे. अभ्युदयनगर ही शासकीय अधिकारी / कर्मचारी व औद्योगिक कामगार यांची वसाहत आहे. मुंबई गृहनिर्माण मंडळाने अनुक्रमे १९९०-९१ व १९९४-९५ साली शासकीय अधिकारी / कर्मचारी व औद्योगिक कामगार यांना इमारतीचे बांधकाम मालकी तत्वावर देऊन इमारती निहाय सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यास परवानगी दिलेली होती. त्यानुसार अभ्युदयनगर मधील एकूण ४८ इमारतीत नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्या व तेव्हापासून इमारतीमधील खालील सेवा-सुविधा सदर नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांमार्फत गाळेधारकांना पुरविल्या जात आहेत.

१) इमारत बांधकाम दुरुस्ती / अंतर्गत गळती व रंगकामाचे खर्च संस्था करत आहेत.

२) इमारतीमधील निवासी / अनिवासी गाळ्यांचा मालमत्ता कर संस्था परस्पर महापालिकेत भरत आहे.

३) इमारतींची स्वच्छता / इमारतीमधील सार्वजनिक विद्युत पुरवठा यांच्या खर्चाची पुर्तता संस्था परस्पर करत आहेत.

सध्या अभ्युदयनगरमधील एकूण ४८ इमारतींच्या गाळेधारकांकरीता मुंबई गृहनिर्माण मंडळाकडून फक्त पाणी पुरवठा करण्यात येते आहे. सदर पाणी पुरवठा करणाऱ्या पंपसेट मागील कित्येक वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार यांचे निधीमधून खरेदी केलेले आहेत.

आज प्राप्त झाले
लिपीक 02/01/18
मुंबई गृह निर्माण व क्षेत्र विकास
मंडळ मुंबई - ४०० ०५१.

पान नं. २ वर....

अभ्युदयनगरमधील जलवाहिन्या दुरुस्ती खर्च देखील कित्येक वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधींच्या फंडातून केला जात आहेत. सदर पाण्याचे पंप चालविण्याकरीता चालक म्हणून जो कर्मचारी/कामगार काम करत आहे. त्यांच्या रोजगाराचा खर्च/विद्युत मोटार दुरुस्तीचा खर्च/अभ्युदयनगरचे नागरिक सामुदायिकरीत्या करत आहेत.

अभ्युदयनगरमधील इमारतींना म्हाडाने बांधलेल्या टाकीतून पाणी पुरवठा होत आहे. त्याकरीता अभ्युदयनगर मधील प्रत्येक गाळेधारक मुंबई गृहनिर्माण मंडळाकडे मासिक सेवा शुल्कापोटी खालील रक्कम नियमितपणे भरत आहे.

| **पुरविण्यात येणारी सेवा** | **भरणा करत असलेली रक्कम** |
|---|---|
| पाणीपट्टी | रु. १२१/- |
| मोटार विद्युत देयक आकार | रु. २७/- |
| लीज भाडे | रु. ३/- |
| **एकूण** | **रु. १५१/-** |

याशिवाय मुंबई गृहनिर्माण मंडळाने वेळोवेळी आकारलेला बिगर शेतीकर वसाहतीमधील प्रत्येक गाळेधारकांनी भरलेला आहे.

अशा परिस्थितीत मुंबई गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळाने अभ्युदयनगरमधील रहिवाशांना विचारात न घेता माहे एप्रिल २०१७ पासून मासिक सेवा शुल्क रुपये १५१/- मध्ये वाढ करुन रुपये १०२७/- आकारण्यास सुरुवात केली आहे. हे वाढीव सेवा शुल्क अभ्युदयनगरमधील गाळेधारकांना अनाकलनीय आहे.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, अभ्युदयनगरच्या गाळेधारकांना / अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्या. व सदस्य सहकारी गृहनिर्माण संस्थांना विचारात न घेता कोणत्याही प्रकारचे सेवा शुल्कात वाढ करण्यात येऊ नये ही विनंती.

आपले विश्वासू,

( नंदकुमार काटकर )
अध्यक्ष

नोंदणी क्र. एमयुएस/एमएच/एडीबी / एचएसजी / टी.सी) १२४९२ / सन २००६-०७

( जयसिंग शि. भोसले )
सरचिटणीस